पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

पुणे, मंगळवार, ७ मे २०१९

# सीबीएसई दहावीच्या निकालात पुण्याच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## सुहानी कोपरे, नमन धर्माणी, ईशा भट्टाचार्य, इशिता जिंतूरकर राज्यातील मानकरी

**प्रतिनिधी, पुणे**

**केंद्रीय माध्यमिक** शिक्षण मंडळाने (सीबीएसई) जाहीर केलेल्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात पुण्यातील विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली आहे. डीएव्ही शाळेची सुहानी कोपरेने ४९६ गुणांसह राज्यात दुसरा, डीएव्ही शाळेचेच नमन धर्माणी आणि ईशा भट्टाचार्य, इंदिरा नॅशनल स्कूलच्या इशिता जिंतूरकरने ४९५ गुणांसह राज्यात तिसरा क्रमांक मिळवला. शहरातील बहुतांश शाळांचा निकाल १०० टक्के लागला.

डीएव्ही पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल लागला. सुहानी कोपरेने ४९६ गुणांसह शाळेत पहिला आणि राज्यात दुसरा, नमन धर्माणी आणि ईशा भट्टाचार्य यांनी ४९५ गुणांसह शाळेत दुसरा आणि राज्यात तिसरा क्रमांक मिळवला. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला. परीक्षा दिलेल्या ८० विद्यार्थ्यांपैकी ६१ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले. त्यात स्पृहा सरनाईक ९८.२ टक्के गुणांसह शाळेत पहिली आली. शाळेची गुणांची सरासरी ९२ टक्के आहे. आभा मराठेने ९७.८ टक्के, रेवती दिवेकरने ९७.६ टक्के गुण मिळवले.

पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी ई लर्निंग स्कूलचा सलग पाचव्या वर्षी १०० टक्के निकाल लागला. शाळेच्या ५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यात सृष्टी चिंतलने ८७ टक्के, आदर्श दोंतुलने ८२.८ टक्के, तर प्रियंका मिसाळला ८२.६ टक्के गुण मिळाले. वानवडीच्या सिटी इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. जान्हवी हृषीकेशने ९७.४ टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. परीक्षा दिलेल्या ८४ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले. केशवनगरच्या द ऑरबिस प्रशालेचाही १०० टक्के निकाल लागला. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले.

> निकाल पाहून खूप आनंद झाला. भाषा विषयांचा अभ्यास परीक्षा जवळ आल्यावर केला आणि गणित आणि विज्ञानाचा अभ्यास रोज करायचे. शाळा आणि शिकवणीशिवाय रोज दोन तास अभ्यासासाठी देत होते. अभ्यासाशिवाय अवांतर वाचन करायचे आणि चित्रही काढायचे. आता अकरावीला विज्ञान शाखेला प्रवेश घेऊन भौतिक शास्त्रात संशोधन करण्याची इच्छा आहे.
>
> \- सुहानी कोपरे

त्यात कवाना अंकलेकरने ९६.६ टक्के गुणांसह प्रथम, अक्षता वसिष्ठने ९५.२ टक्के गुणांसह दुसरा आणि वृष्टी शहाने ९५.२ टक्के गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला. पिंपरीतील गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. आदित्य खानोलकरने ९६.६ टक्के गुणांसह अग्रस्थान मिळवले. ११४ विद्यार्थ्यांपैकी ८२ टक्के विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणी आणि ४२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले.

> गेल्या वर्षीपर्यंत ७० टक्के अंतर्गत आणि ३० टक्के परीक्षेचे गुण होते. त्यावर बरीच टीकाही होत होती. खरेतर ७० टक्के अंतर्गत गुणांची पद्धत अवघड होती. आता २० टक्के अंतर्गत आणि ८० टक्के परीक्षेचे गुण ठेवण्यात आले. त्यामुळे यंदा निकाल कमी होण्याची अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्ष निकाल वाढला आहे. कारण विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षेच्या आधी भरपूर अभ्यास केला असावा आणि पर्यायी प्रश्नांची संख्या वाढल्याने काही प्रश्नपत्रिका सोप्याही होत्या.
>
> मिलिंद नाईक, मुख्याध्यापक, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला